**महाराष्ट्र शासन**
महसूल व विभाग
**जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय**

मध्यवर्ती प्रशासकीय नविन इमारत,दुसरा मजला कक्ष,क्र.202, महसूल शाखा, जयस्तंभ, ता.जि.रत्नागिरी 415612

दुरध्वनी क्र:- **02352-223602** फॅक्सक्र. **02352-226250**
**02352-224222** **Email ID:- reveni ecollector@yahoo.in**

क्र.महसूल/कार्या.अे.के.-6/DCZMA & Task Force/10/2021 दिनांक : 28/10/2021

प्रति,

1. जिल्हा पोलिस अधिक्षक रत्नागिरी
2. जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी
3. विभागीय वन अधिकारी चिपळूण
4. सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी
5. उपविभागीय अधिकारी दापोली/खेड/चिपळूण/रत्नागिरी/राजापूर
6. उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी
7. उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण
8. सहाय्यक आयुक्त मत्सयव्यवसाय रत्नागिरी
9. मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत - खेड/चिपळूण/गुहागर/रत्नागिरी
10. डॉ. एस. सी. ठाकूरदेसाई, उपप्राचार्य गोगटे जोगळेकर कॉलेज, रत्नागिरी
11. श्री. ए.डी.जाधव, प्राध्यापक, डी.बी.जे. महाविदयालय चिपळूण
12. श्री. जितेंद्र पोळ, रा. चांदवण् पो. बुरंबेवाडी ता. राजापूर जि. रत्नागिरी
13. श्री. विनायक सुर्यकांत खडपे, रा. तुळसुंडे ता. राजापूर जि. रत्नागिरी
14. श्री. विठ्ठल भालेकर रा. वेलदूर ता. गुहागर जि. रत्नागिरी

**विषय : जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती (DCZMA) व टास्क फोर्स समिती सभेचे इतिवृत्त - माहे ऑक्टोबर 2021**

जिल्हास्तरीय सागरी किनारा नियमन प्रक्षेत्र व्यवस्थापन समिती व टास्क फोर्स समितीची सभा **दिनांक 18/10/2021 रोजी दुपारी 12.00 वाजता** मा. जिल्हाधिकारी यांचे दालनात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीस्तव यासोबत सादर करण्यात येत आहे. तरी संबंधितांनी अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

**(सुशांत खांडेकर)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

**दिनांक 18/10/2021 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरचित्रवाणी (Video Conference) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| 4. | सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 6. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 7. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 9. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 10. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 11. | उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| 12. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त मत्सयव्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| 13. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| 14. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद खेड | सदस्य |
| 15. | डॉ.ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |
| 16. | श्री. विठ्ठल भालेकर, मच्छिमार प्रतिनिधी रा. वेलदूर ता. गुहागर | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

सागरी किनारा असलेल्या प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती स्थापन करण्याबाबत पर्यावरण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एमसीझेडएमए 2011/सीआर-6/एमसीझेडएमए दिनांक 23/03/2011 ने कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनिटरींग समिती गठीत करण्यात आली आहे.

सदस्य सचिव यांनी सदर जिल्हा स्तरीय समितीला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कोणकोणते कामकाज करावयाचे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर समितीने खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

1. अनधिकृत बांधकामे होऊ न देणे तसेच
2. सागरी पर्यावरणाच्या बाबत सुरक्षा व चांगल्या त-हेच्या धारणांच्या बाबतीत तसेच प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे.
3. नागरीकांच्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करणे.

सीआरझेड I, II, III मधील नियमांचे उल्लंघन करुन अतिक्रमणे केली असल्यास अशी अतिक्रमणे शोधून काढणेची आहेत. सभेमध्ये पुढील विषयावर चर्चा करणेत आली.

**1. मौजे मुरुड ता. दापोली येथील समुद्रकिनारी असलेल्या राहती घरे/निवासी/वाणिज्य बांधकामे यांचे पुनश्च सर्व्हेक्षणाबाबत -**

मौजे मुरुड ता. दापोली येथील सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतचा मुद्दा दिनांक 25/06/2021 रोजी झालेल्या 156 व्या एमसीझेडएम च्या बैठकीमध्ये चर्चेसाठी घेण्यात आला असून सदर बैठकीचे इतिवृत्त या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. सदर इतिवृत्तात नमुद केलेप्रमाणे तज्ञ सदस्य, एमसीझेडएमए यांनी नमुद केले की त्यांच्याकडे अशी माहिती आहे की मौजे मुरुड समुद्रकिनारपट्टीच्या भागात 150-200 च्या आसपास इतर इमारती (राहती घरे/निवासी/वाणिज्य बांधकामे) आहेत. त्यानुसार जिल्हास्तरीय डीसीझेडएमसी, रत्नागिरी यांजकडून अहवाल मागविला जाऊ शकतो. चर्चेनंतर एमसीझेडएमए प्राधिकरणाने डीसीझेडएमसी, रत्नागिरी कडून हा अहवाल घेण्याचा निर्णय घेतला आहे.

तरी मौजे मुरुड समुद्रकिनारी असलेल्या राहती घरे/निवासी/वाणिज्य बांधकामे यांचे तात्काळ पुनश्च सर्व्हेक्षण करुन उपविभागीय अधिकारी दापोली, उपविभाग दापोली यांनी अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

**2. सीआरझेड नियमांचे उल्लंघन करुन तटकिनारवर्ती भागात बांधकाम केलेल्या अनधिकृत बांधकाम धारक यांचे सर्व्हेक्षण करुन विहीत नमुन्यातील माहिती सादर करणेबाबत -**

उपविभागीय अधिकारी रत्नागिरी, खेड व दापोली यांजकडील माहिती प्राप्त असून अन्य उपविभागीय अधिकारी चिपळूण व राजापूर यांजकडील माहिती अदयाप प्रलंबित आहे.

तरी सीआरझेड क्षेत्रामध्ये केलेल्या अनधिकृत बांधकामाचे उपविभागीय अधिकारी (सर्व) यांनी पुनश्च सर्व्हेक्षण करुन यादी अंतिम करुन अदयावत माहिती या कार्यालयाकडे पुढील बैठकीचे पुर्वी सादर करावी. तसेच सीआरझेड क्षेत्रामध्ये यापुढे अनधिकृत बांधकाम होणार नाही याकडे विशेष लक्ष पुरविणेचे निर्देश अध्यक्ष यांनी सर्व उपविभागीय अधिकारी व मुख्याधिकारी यांना दिले.

**3. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल**

सीआरझेड क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकाम केलेबाबत एमसीझेडएमए, मुंबई तसेच नागरिक यांचेकडून या कार्यालयाकडे तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदरच्या तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविणेत आल्या आहेत. तरी सदर तक्रारींबाबत योग्य ती कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच सदयस्थितीचा अहवाल या कार्यालयाकडे पुढील बैठकीचे पुर्वी सादर करणेबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

तसेच प्रलंबित तक्रारी अर्जांची यादी संबंधित उपविभागीय अधिकारी यांना ई-मेल द्वारे पाठविणेबाबत सदस्य सचिव यांनी निर्देश दिले.

4. **Non receipt of information on Audit Memorandums -**

**iii) Complaint case regarding water pollution near Jaigad Sea Shore from constrction of gas storage tak of Hiranandani Gas Agency made by Jaigad Matsya Vyavsay Sahakari Sanstha Ltd**

मा. शास्त्रज्ञ-II, पर्यावरण व हवामान बदल विभाग तथा एमसीझेडएमए, मुंबई यांनी दिनांक 07/07/2021 रोजीचे पत्रान्वये तक्रारी अर्जाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा सदयस्थितीचा अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

मौजे जयगड ता.जि. रत्नागिरी येथे समुद्रकिनारी हिरानंदानी गॅस एजन्सी यांनी गॅस साठवण टाकीचे बांधकाम केलेमुळे पाण्याचे प्रदुषण होत असलेबाबतची तक्रार जयगड मस्त्य व्यवसाय सहकारी संस्था यांनी उपस्थित केली आहे.

सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने सदयस्थितीचा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व CRZ अधिसूचना मधील तरतूदीनूसार या कार्यालयाकडे त्वरीत सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी रत्नागिरी उपविभाग रत्नागिरी यांना या कार्यालयाकडील दिनांक 15/09/2021 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

याबाबत सदयस्थितीबाबत प्रतिनिधी-उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांना विचारणा केली असता, प्रस्तुत प्रकरणी प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रत्नागिरी यांना दिनांक 16/09/2021 रोजीचे पत्रान्वये तक्रार अर्जाचे अनुषंगाने तात्काळ अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रत्नागिरी यांजकडून अहवाल प्राप्त होताच अहवाल सादर करणेत येईल असे, प्रतिनिधी-उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांनी सांगितले.

यावर सदस्य सचिव यांनी प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, रत्नागिरी यांना स्मरणपत्र काढून तात्काळ अहवाल घेवुन पुढील बैठकीपुर्वी सदर तपासणी मुद्द्याचा अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले.

**iv) Complaint case regarding illegal construction is going on endangering ecological wild life made by Shri. Balvant Parchure**

मा. शास्त्रज्ञ-II, पर्यावरण व हवामान बदल विभाग तथा एमसीझेडएमए, मुंबई यांनी दिनांक 07/07/2021 रोजीचे पत्रान्वये तक्रारी अर्जाचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा सदयस्थितीचा अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

पर्यावरणीय वन्यजीव धोक्यात घालून बेकायदा बांधकाम सुरू असलेबाबत श्री. बळवंत परचुरे यांनी तक्रार उपस्थित केली आहे.

सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने सदयस्थितीचा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व CRZ अधिसूचना मधील तरतूदीनूसार या कार्यालयाकडे त्वरीत सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी चिपळूण उपविभाग चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 15/09/2021 रोजीचे पत्रान्वये देण्यात आले आहेत.

याबाबत सदयस्थितीबाबत प्रतिनिधी-उपविभागीय अधिकारी चिपळूण यांना विचारणा केली असता पुढील बैठकीपुर्वी सदर तपासणी मुद्दयाचा अहवाल सादर करणेत येईल असे प्रतिनिधी-उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी अध्यक्ष यांना सांगितले.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना -**

1. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेलया बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
2. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
3. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
4. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जाबाबत सहा. संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
5. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

**विशेष सूचना -**

1. यापुढील जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा व टास्क फोर्स समितीची सभा **दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी घेणेत येईल.**
2. जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती व टास्क फोर्स समिती सभेची विषयपत्रिका (Agenda) व तारिख याबाबत जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या अधिकृत वेबसाईट www.ratnagiri.gov.in वर प्रसिध्द करावी.
3. जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती व टास्क फोर्स समिती यांच्या यापुर्वी झालेल्या बैठका व पुढील होणा-या बैठका यांचे इतिवृत्त (Minutes of Meeting) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या अधिकृत वेबसाईट www.ratnagiri.gov.in वर प्रसिध्द करावे.
4. तांत्रिक कामी जिल्हा सूचना व विज्ञान केंद्र रत्नागिरी यांनी सहाय्य करावयाचे आहे.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकरी रत्नागिरी यांचे स्वाक्षरीची आहे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/DCZMA/10/2021
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 28/10/2021

**(सुशांत खांडेकर)**
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

**दिनांक 18/10/2021 रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरचित्रवाणी (Video Conference) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 4. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 5. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| 6. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| 7. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| 8. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| 9. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| 10. | प्रतिनिधी उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| 11. | उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय टास्क फोर्स समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 चे कलम 5 प्रमाणे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सीआरझेड अधिसूचना 1991 व 2011 च्या तरतूदींचे उल्लंघन करणा-या बाबींचे सर्व्हेक्षण करुन तरतूदींचा भंग झाला असल्यास त्यावर कार्यवाही करणेची आहे.

1. विनापरवाना बांधकाम प्रकरणे शोधणे.
2. पर्यावरण खात्याची परवानगी न घेतलेली परंतु इतर खात्याची परवानगी घेऊन पुर्ण झालेली अगर अपूर्ण बांधकामे शोधणे.
3. पर्यावरण खात्याची परवानगी घेतलेली परंतु अटी व शर्तीचा भंग झालेली प्रकरण शोधणे.

**<u>सीआरझेड नियमांचे पालन संबंधित जमीनमालक/ जमीन विकासक यांचेकडून झाले किंवा कसे याची पाहणी पथकाकडून करुन अनुसूची अ व ब प्रमाणे माहिती सादर करण्याबाबत</u> -**

सागरी किनारी होणा-या बांधकामांचे बाबतीत वेळोवेळी प्रचलित सीआरझेड नियमांचे पालन संबंधीत जमिन मालक/ विकासक यांचेकडून झाले आहे किंवा कसे याची पहाणी करणे अवश्यक असलेमुळे या कार्यालयाकडील दिनांक 13/01/2014 च्या आदेशान्वये तपासणी पथकांची नियुक्ती करणेत आली होती.

सदर पथकाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच पथकांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले -

1. पथकांमध्ये नगर रचनाकार व भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असुन तांत्रिक बाबींमध्ये त्यांचे सहाय्य घेणेचे आहे.
2. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील कलम 18 नुसार नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांना नियोजन प्राधिकरण नेमलेले आहे. तरी नगर परिषद /नगर पंचायत क्षेत्रामध्ये मुख्याधिकारी यांनी सीआरझेड नियमांचे उल्लंघन होते अगर कसे? याची पडताळणी करणेची आहे.
3. ग्रामीण भागातील बांधकामाचे बाबतीत उपविभागीय अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांचे सहाय्य घ्यावे तसेच तांत्रिक बाबीमध्ये सहाय्यक संचालक नगर रचना यांचे अभिप्राय घ्यावेत.

उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे उपविभागातील सर्व्हेक्षण पथकाचा अंतिम अहवाल पुढील बैठकीचे पुर्वी सादर करणेचा आहे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनीच सभेस येणेचे आहे प्रतिनिधी पाठवू नयेत अशा सूचना देण्यात आल्या व सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे स्वाक्षरीची आहे.**

क्र. महसूल/कार्या/अे.के. 6/टास्कफोर्स/10/2021
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - 28/10/2021

**(सुशांत खांडेकर)**
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**

प्रतिलिपी - सर्व संबंधितांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी